पुढारी

# लोणावळा चित्रपट महोत्सव उद्यापासून

## संस्मरणीय चित्रपट होणार प्रदर्शित : ९ चित्रपट मोफत पाहण्याची संधी

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

सहाव्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात लिफ्फी २०२१ यंदा २४ सप्टेंबरपासून प्रारंभ होणार आहे. या महोत्सवाद्वारे दिवगंत चित्रपट निर्माते शक्ती सामंता यांना विशेष श्रध्दांजली अर्पण करण्यात येणार आहे. त्यांच्या गाजलेल्या चित्रपटांचा आस्वाद रसिकांना या महोत्सवात घेता येणार आहे. रसिकांसाठी हा महोत्सव २४ ते २६ सप्टेंबर, १ ते ३ आणि ८ ते १० ऑक्टोबर या दरम्यान रोज सायंकाळी ६ वाजता ऑनलाईन आयोजित केला जाणार असल्याची माहिती लिफी महोत्सवाचे संचालक माधव तोडी यांनी दिली.

महोत्सवाचे कार्यक्रम प्रमुख म्हणून विवेक वासवानी काम पाहणार आहेत. विविध राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय महोत्सवात दाखविण्यात येणाऱ्या चित्रपटांना अभिजात दर्जा का आणि कसा मिळाला, याबाबत या महोत्सवात चर्चा होणार आहे. या चर्चेत आशिम सामंता, संदीप सोपारकर, पूजा देसाई, ब्रह्मानंद सिंह, ज्योतीन गोयल, तुषार भाटिया, दिव्य सोलगमा सहभागी होणार आहेत. या महोत्सवात ९ चित्रपट दाखविण्यात येणार असून प्रारंभ ॲन इव्हनिंग इन पॅरिस या चित्रपटाद्वारे होणार आहे. प्लेक्सिगो या मोबाईल ॲपवर चित्रपट मोफत पाहता येतील, असे सांगण्यात आले.



### राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपटांचा रसास्वाद

**महोत्सवाच्या पहिल्या आठवड्यात शम्मी कपूर यांचे चित्रपट दाखविण्यात येणार आहेत. त्यात ॲन इव्हनिंग इन पॅरिस, काश्मीर की कली आणि चायना टाउन या चित्रपटांचा समावेश आहे. दुसऱ्या आठवड्यात राजेश खन्ना यांच्या रोमँटिक चित्रपटांचा रसास्वाद रसिकांना घेता येईल. त्यात आराधना, कटी पतंग आणि अमर प्रेम यासारखे लोकप्रिय चित्रपट पाहण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. तिसऱ्या आठवड्यात बरसात की एक रात, अमानुष आणि पंचम अनप्लग्ड या चित्रपटांनी महोत्सवाचा समारोप होणार आहे. प्रत्येक चित्रपटापूर्वी त्यावर तज्ज्ञ आणि समीक्षक चर्चा करणार आहेत, असे तोडी यांनी सांगितले.**

Thane Edition
Sep 23, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in